# VACHAN PRERANA DAY 2018 (15-10-18)



# गोखले महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात


**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

येथील गोखले महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

प्रा. डॉ. गडकरी म्हणाले, डॉ. कलाम हे उत्कृष्ट वाचक होते. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विज्ञानतज्ज्ञ होते. तरुणांमध्ये वाचनाविषयी आवड निर्माण व्हावी यासाठी ते सतत प्रयत्नशील होते. त्यांचे जीवनकार्य भावी पिढीसाठी प्रेरणादायी आहे.

यावेळी बी.एस्सी. भाग ३ च्या अनुक्रमे गौर पाटील, विवेक कुंभार व संकेत नायकवडी य विद्यार्थ्यांनी चर्चासत्रात सहभाग घेतला आि वृत्तपत्रातील डॉ. कलाम यांच्यासंबंधीचे अग्रले वाचून दाखविले.

प्रास्ताविक प्रा. डॉ. ए. बी. गडकरी यांनी केले सूत्रसंचालन गौरव पाटील याने केले. आभार ताना हजारे यांनी मानले.







**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**

**Web :** www.dhepune **E-Mail :** mavi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३.

क्र.: उशिसं//मवि-१/वाचन प्रेरणा दिवस/परिपत्रक२०१८/९७६१ दिनांक: ०५.१०.२०१८

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

**विषय: डॉ.ए.पी.जे. अब्दूल कलाम यांचा जन्मदिवस- दि. १५ ऑक्टोंबर हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करणेबाबत..**

संदर्भ: मराठी भाषा विभागाचा शासन निर्णय क्र.: वाप्रेदि-२०१८/प्र.क्र.१३३/भाषा-३
दि. १.१०.२०१८

भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे.अब्दूल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोंबर हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्याबाबत शासन परिपत्रक क्र.: बैठक-२४१३/ प्र. क्र. १४०/ १५/समन्वय दि. ०९ ऑक्टोंबर २०१५ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

याच अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये व समाजाच्या इतर घटकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याबाबत संभाव्य कार्यक्रमांची यादी संदर्भांकित शासन निर्णयान्वये देण्यात आलेली आहे. त्यानूसार दि. १५ ऑक्टोंबर हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून दरवर्षी साजरा करण्याबाबत आपल्या अधिनस्त सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

दि. १.१०.२०१८ च्या शासन निर्णयातील कार्यक्रमांबरोबरच पुढील उपक्रम ही राबविता येऊ शकतील याबाबत सर्व संबंधितांना अवगत करावे-

१. महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त महात्मा गांधी यांच्या पुस्तकांचे वाटप. उदा.- माझे सत्याचे प्रयोग.
२. ग्रंथदिंडी
३. विद्यार्थ्यांचा वाचलेल्या पुस्तकांबाबत चर्चा/परिसंवाद
४. महान व्यक्तींच्या मौलीक विचारांचे सामुहिक वाचन
५. पुस्तकावरच्या गप्पा
६. थोर व्यक्तींच्या आयुष्यातील वाचनाचा प्रभाव- भित्तीचित्रे
७. गरजू व वाचनाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना पुर्व मागणी नूसार मोफत पुस्तक वाटप
८. पुस्तक लॉटरी - विद्यार्थी/कर्मचा-यांना अनपेक्षितपणे आवडत्या पुस्तकाची भेट.
९. पुस्तकांवरील प्रश्नमंजूषा
१०. प्रशासनामध्ये उपयुक्त पुस्तकांचे कर्मचारी व अधिका-यांना पुस्तक भेट

To Knowledge Resource Centre.

circulate to all colleges and departments.

08/10/18

६. भारतातील पहिलं पुस्तकांच गाव (भिलार, ता. महाबळेश्वर, जि. सातारा) या उपक्रमाची माहिती विविध माध्यमांतून विद्यार्थ्यांना देणे किंवा निवडक विद्यार्थ्यांना घेऊन अभ्यास सहलींचे आयोजन करण्यात यावे.

७. संकल्प - महिन्यातील एक दिवस "नो गॅजेट डे" म्हणून कृतीत आणण्याचे आवाहन. ("नो गॅजेट डे" - मोबाईल, व्हॉटस्‌ॲप ,फेसबुक ,ट्विटर न वापरता तो वेळ वाचनासाठी देणे).

८. पुष्पगुच्छ नव्हे पुस्तक (बुके नव्हे बूक) - सार्वजनिक कार्यक्रमांत पाहुण्यांना पुष्पगुच्छाऐवजी पुस्तक भेट देण्याच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी व प्रसार.( वाढदिवशी किंवा वाचन प्रेरणा दिनाचे निमित्त साधून परस्परांना पुस्तक भेट देण्याचे आवाहन)

९. शाळा ,महाविद्यालय, ग्रंथालय व इतर संस्थांनी आपल्या परिसरात "डॉ.ए.पी.जे .अब्दुल कलाम वाचन कट्टा" निर्मिती करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१००११६२९५८१५३३ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aparna Arvind Gawde
Digitally signed by Aparna Arvind Gawde
DN: CN = Aparna Arvind Gawde, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Marathi Language Department
Date: 2018.10.01 16:43:44 +05'30'

(अपर्णा अ. गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री (मराठी भाषा) यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
४. मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव
६. मा.मुख्य सचिव / सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने),
८. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई (पत्राने),
९. प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१०. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ, विधान भवन, मुंबई,१२.
११. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२. सर्व मंत्रालयीन विभाग,
१३. सर्व विभागीय आयुक्त,

आपल्या कल्पनाशक्तीनूसार नावीन्यपुर्ण व अभिनव उपक्रम योजू शकता. कार्यक्रमामध्ये उपस्थितांचा (विद्यार्थी/रसिक वाचकांचा) प्रत्यक्ष सहभाग हे सूत्र कार्यक्रम योजताना अमलात आणले जावे व कार्यक्रम शांततेत पार पडेल याची दक्षता घ्यावी.

सदर कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर महाविद्यालये/विद्यापीठातील कार्यक्रमांचा छायाचित्रांसह अहवाल संकलित करुन एकत्रितपणे या संचालनालयास सादर करावा.

(डॉ. मोहन खताळ)
शिक्षण सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.